अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबाना
अन्नधान्य वितरीत करण्याबाबत कार्यपद्धती

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः अधापु-२०१९/प्र.क्र.१०५/नापु-२२

हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: ७ ऑगस्ट, २०१९

वाचा:-

(१महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र .सीएलएस-२०१८/प्र.क्र.२२५/म-३, दि.८.३.२०१९.

२) Ministry of Consumer Affairs, Food and Public Distribution, Government of India यांचे पत्र क्र. 1-5/2013-BP-III, दि. २२.०८.२०१७

प्रस्तावना:-

अतिवृष्टी व पुरामुळे आपत्कालिन परिस्थिती उद्भवून दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास, त्यामुळे निराधार होणाऱ्या कुटुंबांना प्रति कुटुंब १० किलो गहू व १० किलो तांदूळ मोफत पुरविण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे. सदर परिस्थितीत अन्नधान्याचे कशाप्रकारे वाटप करावे, त्या अन्नधान्याकरीता आवश्यक असलेला निधी महसूल विभागाकडून कोणत्या दराने प्राप्त करून घ्यावा, इत्यादीकरीता आवश्यक असलेली कार्यपध्दती सर्व संबंधितांना कळविण्याच्या अनुषंगाने पुढील सूचना देण्यात येत आहेत:-

शासन परिपत्रक:-

अतिवृष्टी व पुरामुळे आपत्कालिन परिस्थिती उद्भवून दोन दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी क्षेत्र पाण्यात बुडाले असल्यास, त्यामुळे निराधार होणाऱ्या कुटुंबांना अन्नधान्याचे वाटप करताना पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी :-

१) महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दिनांक ८.३.२०१९ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार अतिवृष्टी व पूरपरिस्थिती निर्माण झाल्याचे संबंधित जिल्हाधिकारी यांनी जाहीर करणे,

२) जिल्हास्तरावरील महसूल विभागाने अतिवृष्टी/पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबाची संख्या, त्यांना आवश्यक असणारे गहू व तांदळाचे प्रमाण, बाधित कुटुंबाची यादी इ. आवश्यक बाबी संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांना कळविणे, (जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी महसूल विभागाकडून प्राप्त करून घेणे.)

३) सदर अन्नधान्याचे वाटप जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी त्यांच्याकडे लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप सुरू असलेल्या परंतु गोदामात साठवणूकीमुळे शिल्लक असलेल्या अन्नधान्यामधून तात्काळ सुरू करावे,

४) महसूल व वन विभागाच्या संदर्भाधीन दि.८.३.२०१९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार आपत्कालिन परिस्थिती उद्भवल्यानंतरच्या एक आठवड्यात सदर अन्नधान्याचे वाटप करावयाचे असल्याने सदर वाटप पूर्ण झाल्यानंतर वाटप केलेल्या अन्नधान्याएवढ्या अन्नधान्याची अतिरिक्त मागणी जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी तात्काळ शासनाकडे करावी,

५) सदर अन्नधान्यासाठी आवश्यक असलेला निधी केंद्र शासनाच्या दिनांक १८.८.२०१७ च्या पत्रामध्ये परिच्छेद-(C) मध्ये नमूद केलेल्या दराने (MSP/MSP derived rate) जिल्हास्तरावरील महसूल विभागाकडून जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी तात्काळ उपलब्ध करुन घ्यावा,

६) राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे सदर अन्नधान्याची मागणी केल्यानंतर व त्या अन्नधान्यास केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्या मंजुरी आदेशांच्या आधारे जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उप नियंत्रक यांनी भारतीय अन्न महामंडळाकडे प्रचलित MSP/ MSP derived rate ने रकमा जमा करुन अन्नधान्याची उचल करुन अतिवृष्टी/पूर परिस्थिती या करिता वाटप केलेल्या अन्नधान्याचे समायोजन करावे.

७) अतिवृष्टी/पूरग्रस्तांना वाटप केलेल्या अन्नधान्याचा तपशील, महसूल विभागाकडून अन्नधान्याकरिता प्राप्त केलेल्या रकमा, भारतीय अन्न महामंडळाकडे प्रचलित MSP/ MSP derived rate ने जमा केलेल्या रकमा, अन्नधान्याचे समायोजन केलेल्या अन्नधान्याचा तपशील याबाबतची माहिती नापु-२२ कार्यासनास तसेच वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना कळवावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०७१७१४५७६३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Hemant Raghunath Wadikar

Digitally signed by Hemant Raghunath Wadikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d625ae15602d3ab3345690ad8034be0a2c6937e181f74a8b36405029a161ebf, cn=Hemant Raghunath Wadikar
Date: 2019.08.07 17:20:56 +05'30'

(हेमंत वाडीकर)

कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. सर्व विभागीय आयुक्त
१०.सर्व जिल्हाधिकारी
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१२.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१३.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१४.सर्व उपायुक्त (पुरवठा)
१५.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१६.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
१७.सर्व अधिकारी (सचिव वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१८. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१९.सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२०.सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२२.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई.
२३.प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
२४.सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२५.निवडनस्ती (कार्यासन नापु-२२).